# मुंबई मेट्रोने सादर केले आगामी सीएसटी स्थानकाचे चित्तथरारक हवाई दृश्य

मुंबई : मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशन कडून मेट्रो-३ च्या कामाच्या प्रगतीची माहिती नियमितपणे एमएमआरसीएलच्या अधिकृत ट्विटर अकाऊंटवरुन देण्यात येते. नुकतेच मेट्रो रेल कॉर्पोरेशनने



(एमएमआरसी) आगामी सीएसटी मेट्रो स्थानकाचा हवाई चित्तथरारक व्हिडिओ ट्विटर अकाऊंटवरून प्रसिद्ध केला आहे. या मचित्तथरारकफ १.२५ मिनिटांच्या हवाई व्हिडिओला सुमारे १५ हजारांहून अधिक व्ह्यूज् मिळाले आहेत. २५० मीटर लांबीच्या मेट्रो स्थानकात एमसीजीएम मुख्यालय, सीएसएमटी मध्य रेल्वे स्टेशन, प्रेस क्लब, जेजे स्कूल ऑफ आर्ट्स, मेट्रो सिनेमा अशा प्रमुख ठिकाणांना जोडणारे सहा मार्ग प्रवेशासाठी असून तसेच एक्झिट पॉईंट असणार आहे. कॉर्पोरेशन ३३.५ किमी लांबीच्या कुलाबा-सीप्झ मेट्रो ३ ची प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी यापुर्वीच आरेतील २ हजार १४१ झाडे तोडण्यात आले होते. यावेळी अनेक कार्यकर्त्यांनी आणि पर्यावरणप्रेमींनी या घटनेला विरोध दर्शविला होता. मात्र त्यावेळी सुद्धा वृक्ष तोडीचे समर्थन व वृक्ष तोड का गरजेची आहे, या विषयीचे स्पष्टीकरण देखील ट्विटरवर देण्यात आले होते.